रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर

**शिष्यवृत्ती नोटीस - २०२०-२०२१ ०६.१२.२०२०**

# ११ वी व १२ वी कॉमर्स

**एस.बी.सी. कॅटेगिरीतील अनुदानित (Grant) व विना-अनुदानित (Non-Grant) तुकडीतील सर्व विद्यार्थ्यांसाठी**

# एस.बी.सी. शिष्यवृत्ती, फ्रि-शिप व राजर्षी शाहू महाराज गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना

सन २०२०-२१ मध्ये प्रवेश घेतलेल्या ज्युनिअर महाविद्यालयातील एस.बी.सी. कॅटेगिरीतील अनुदानित व विनाअनुदानित तुकडीत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की सन २०२०-२१ साठी शिष्यवृत्ती, फ्रि-शिप व राजर्षी शाहू महाराज गुणवंत विद्यार्थी योजनेचे अर्ज ऑनलाईन भरण्याची प्रक्रीया सुरु झालेली आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज **mahadbtmahait.gov.in**या वेबसाईटवर ऑनलाईन भरुन महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागात दि.१५/१२/२०२० ते १५/०१/२०२१ अखेर सकाळी ११:०० ते दुपारी १:३० वाजेपर्यंत या दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच जमा करावेत.

**ऑनलाईन फॉर्म भरताना फक्त ओरीजनलच कागदपत्र अपलोड करावे. झेरॉक्स अपलोड करु नये.** झेरॉक्स अपलोड केले तर अशा विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यार्थी लॉगीनला परत पाठविले जातील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| १. | शिष्यवृत्ती व फ्रि-शिप अर्ज भरताना फी पेड झिरो (शून्य) टाकावी. |
| २. | ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १,००,०००/- च्या आत असेल अशा विद्यार्थ्यांना एस.बी.सी. शिष्यवृत्तीचा अर्ज भरता येईल. **जातीचा दाखला नसल्यास अर्ज भरता येणार नाही.** |
| ३. | ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपये ते ८ लाख रुपयाच्या आत असेल अशा विद्यार्थ्यांना एस.बी.सी. फ्रि-शिपचा अर्ज भरता येईल. |
| ४. | तसेच एस.बी.सी. कॅटेगिरीतील ज्या विद्यार्थ्यांना इ. १० वीला ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त टक्के असतील अशा विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवंत विद्यार्थी या योजनेचा अर्जदेखील भरता येईल.**म्हणजे एस.बी.सी. कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांना पात्र असल्यास दोन शिष्यवृत्तीचे अर्ज भरता येईल.** |

**शिष्यवृत्ती अर्जाला खालील प्रमाणे कागदपत्रे अटेस्टेड किंवा सेल्फ अटेस्टेड करुन जोडावीत**

(१) ऑनलाईन भरलेला अर्ज (२) डोमासाईल सर्टिफिकेट (३) रेशन कार्ड (४) अल्प कुटुंबाबतचे प्रमाणपत्र (महाडीबीटी वेबसाईटवर दिलेले-साध्या कागदावर देणे) (५) या महाविद्यालयातील तसेच बाहेरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाळेचा तसेच संबंधीत महाविद्यालयाच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी. (६) आधारकार्ड (७) आधार कार्ड बँक खात्याशी लिंक असलेला फॉर्म बँकेच्या सही शिक्क्यासह. (८) जातीचा दाखला. (९) प्रवेश पावती सन २०२०-२१ ची (१०) **सन २०१९-२० चा ओरिजनल उत्पन्नाचा तहसिलदार यांचेकडील दाखला जोडावा.** (११)ओ.बी.सी./ एस.बी.सी./ एन.टी./ मधील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख ते ८ लाखांपर्यंत असेल अशा विद्यार्थ्यांना आपल्या फ्रि-शिप अर्जाबरोबर **नॉन-क्रिमिलियरचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.**(१२)दहावी व त्यापुढील सर्व गुणपत्रक (फेल व एटीकेटीसह ) (१३) बँक पासबुक

प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे.

www.cdjcollege.com